**प्रेस नोट** **दि.१२/०५/२०१९**

## लष्कर पोलीस स्टेशन पुणे

## वाहन चोरीच्या आरोपीस रंगेहाथ अटक केलेबाबत.

लष्कर पोलीस स्टेशन कडील तपास पथकातील, पोलीस उप निरीक्षक प्रसाद गज्जेवार, पो.हवा.३१२५ शितोळे, पो.हवा.५८२६ थिकोळे, पो.ना.२४०० शिंदे, पो.शि. ९८१५ भोसले. असे पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींगकरीत असतांना फिरत - फिरत, ईस्ट स्ट्रीट रोड कॅम्प पुणे, येथे स्टेट बँक ऑफइंडीया येथे आलो असता एक इसम पार्कींग जागेत त्याचे ताब्यातील गाडीसह संशंयीत रित्या वावरत असतांना आढळुन आला त्यास पो.शि. भोसले यांनी हटकले असता तो पळुन जावू लागल्याने त्यास वरील स्टाफचे मदतीने १९/०० वाजता पकडुन पळुन जाण्याचे व त्याचे ताब्यातील गाडीबाबत विचारणा केली असता तो उडवा उडवीचे व असमाधान कारक उत्तरे देवू लागल्याने त्यास गाडीसह पोलीस स्टेशन येथे आणुन त्यास त्याचा नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव कुणाल राजेश चावरीया वय २३ वर्षे रा. फ्लॅट नं.११०, बिल्डींग ३ री प्रथमा एस आर ए बिल्डींग, स नं.११० रामटेकडी पुणे. असे सांगीतले. त्याचेकडे त्याचे ताब्यात मिळालेली मोटार सायकल क्रं. एम एच १२ ई यु ११७३ या गाडीबाबत विचारपुस केली असता त्याने सदरची गाडी एक महीण्यापुर्वी फॅशन मार्केट येथुन पार्कींग जागेतून चोरी केली असल्याचे सांगीतले. सदर बाबत लष्कर पोलीस स्टेशन येथे गु र नं.२०८/२०१९ भादंवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याने व त्याने गुन्हयाची कबुली दिल्याने त्याला दि.०९/०५/२०१९ रोजी २०/०५ वा. अटक करण्यात आली आहे. सदरची कामगीरी मा. चंद्रकांत द. भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक लष्कर पोलीस स्टेशन , पुणे यांचे मार्गदर्शना खाली करण्यात आलेली आहे.